प्रा. बाजीराव कृष्णाजी पाटील
मराठी विभाग प्रमुख
राधानगरी महाविद्यालय, राधानगरी.

# लघु संशोधन प्रकल्प

## शीर्षक :- 'कोकण आणि घाटमाथ्यावरील गावांच्या बोलींचा अभ्यास'

(फोंडा ते राधानगरी दरम्यानच्या गावांच्या अनुषंगाने)

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र हा खंडप्राय प्रदेश आहे. या ठिकाणी विविध जाती धर्मांचे पंथाचे लोक वेगवेगळ्या प्रदेशात राहतात. इथे सामाजिक, सांस्कृतिक समता असली तरी हा प्रदेश अनेक विभागात परसलेला असल्यामुळे त्यामध्ये प्रादेशिक भिन्नता आढळते. या प्रदेशपरत्वे त्या-त्या विभागात कांही प्रादेशिक भाषा, तर प्रदेशानुसार भिन्न भिन्न बोलीभाषाही आढळतात. कोणतीही भाषा ही मानवी भावभावनांच्या आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम आहे. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजाप्रमाणेच भाषा ही सुध्दा मुलभूत गरज आहे. एखाद्या प्रदेशातील सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन आणि संक्रमण भाषेच्या माध्यमातून होते. कोणतीही भाषा त्या - त्या प्रदेशाचे वर्तमान असते. कधी-कधी या भाषेत प्रदेश, शिक्षण, व्यापार दळण-वळण, आक्रमण यामुळे भाषेचे संक्रमण होण्याची शक्यता असते. त्यामुळे मुळभाषेचा आकृतीबंध बदलतो.

भाषाशास्त्राच्या दृष्टीने तर दर दहा ते बारा मैलाला भाषा बदलली जाण्याची शक्यता असते असे मानले जाते. एकाच प्रदेशातील मूळ बोली वरील कारणांनी बदलली की, तिचा सर्वाधिक परिणाम हा तिथल्या बोलीवर होतो. बोली हा प्रमाण भाषेचा आत्मा असतो. अशा बोलीत तिचे मूळ व्याकरण, शब्दसंपत्ती, वाक्यरचना, शब्द यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होतात. हे भाषिक आक्रमण दीर्घकाळ झाले की कालांतराने संक्रमित झालेली ही भाषा कधी-कधी मूळभाषेचे रुप घेतल्याचे दिसते. अलीकडच्या काळात व्यापार आणि दळणवळण यामुळे तर भाषिक संक्रमण झपाट्याने होत आहे.

आपण ज्या भाषेचा या विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करणार आहोत तो दाजीपूर परिसर कोल्हापूरचा पश्चिमेकडील दुर्गमभाग आणि सिंधूदुर्ग जिल्ह्यातील फोंडा घाटाच्या माथ्यावरील भाग आहे. या परिसरातील सर्व भागाचा सहसंबंध हा घाटमाथा आणि तळ यांच्याशी संबंधित असून या ठिकाणच्या मूळ भाषेवर दोन्ही प्रदेशातील भाषांचे आक्रमण झाले आहे. त्या सर्व भाषिक संक्रमणांचा त्यामधील साम्य तत्वांचा, भेदांचा व अन्य वैशिष्ट्यांचा अभ्यास या प्रकल्पामधून विषयाच्या अनुषंगाने करायचा आहे.

**पूर्वाभ्यासाचे स्वरुप :-**

मराठी साहित्यातील बोलींच्या अंगाने प्रथम सर जॉर्ज गिअरसन यांनी १९८४ मध्ये मराठींच्या बोलींचा अभ्यास केला आहे. या बरोबरच डॉ.ना.गो. कालेलकर यांनी भाषा आणि संस्कृती, डॉ. सु.बा. कुलकर्णी यांनी "पोवारी बोली", डॉ. विजय चिटणीस यांनी 'खानदेशी'(अहिराणी), डॉ. व.ह. वऱ्हाडपांडे यांनी 'नागपूरी', प्रा. अ.का. प्रियोळकर यांनी 'कोकणी', डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी 'झाडीबोली' डॉ. वि.बा. प्रभुदेसाई यांनी 'गोमंतकी' बोलींचा अभ्यास केलेला दिसून येतो. डॉ. न.भि. कवडी यांनी 'डांगीची लोकगीतें' यांचे संशोधन केले आहे. बोलींच्या संदर्भात इत्यादी संशोधन झाले असले तरी राधानगरी तालुक्याच्या परिसीमांना जोडून असणाऱ्या कोकण आणि घाटमाथ्यावरील बोलींचा अभ्यास व त्या संदर्भातील संशोधन झालेले नाही. त्यामुळे कोकण आणि घाटमाथ्यावरील गावांच्या बोलींचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

Scanned by CamScanner

## अभ्यास विषयाचे महत्व :-

भाषा विज्ञानाच्या दृष्टीने कोणतेही बोली श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असत नाही. प्रत्येक बोलीचे विशेष ठरलेले असतात. बोलींची स्वत:ची व्याकरणिक व उच्चारण व्यवस्था असते बोलींचा लेखनासाठी वापर करायचा नाही असाही एक समज आहे. मात्र आज समाजात सर्वत्र आपआपल्या बोलीभाषेत अनुभव मांडण्याचा प्रयत्न लेखक करत आहेत. निग्रो साहित्य चळवळ त्यातूनच निर्माण झाली. मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी अशा साहित्य प्रवाहात वेगवेगळ्या बोलींचा वापर होत असलेला दिसत आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक प्रवाह आले. प्रदेशवार, प्रांतवार लेखन होऊ लागले. त्या-त्या प्रांतातील प्रदेशातील लेखक आपल्या भोवतालचा जीवनानुभव साहित्यातून चित्रित करु लागले. प्रादेशिक लेखन साहित्यनिर्मिती होऊ लागली. मराठी साहित्यात वऱ्हाडी, खानदेशी, गोमंतकी, डांगी कोकणी इत्यादी बोलीमधून त्या-त्या प्रदेशांचे चित्रण येऊ लागले मराठी साहित्यिकांनी बोलीमधून शैलीदृष्ट्या नवचैतन्य मिळविल्याचे दिसून येते.

आजवर कोकणी, अहिराणी, डांगी अशा अनेक भाषांचा अभ्यास केला गेला. भौगोलिक आणि सामाजिकदृष्ट्या त्या प्रदेशांना आणि पर्यायाने तेथील बोलीला महत्व असल्याने प्रमाण भाषेइतकीच या बोलीभाषेंची चिकित्साही झाली. या भाषा, त्यांचे व्याकरण, तिचा आकृतीबंध, लोकजीवनावरील परिणाम इत्यादींचा अभ्यास केला गेला. प्रस्तुत कोकणी घाटी भाषा ही सुध्दा अशी एक उपभाषा आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेला आणि कोकणचे प्रवेशव्दार असलेल्या पूर्वभागातील घाट परिसरात कोल्हापूर आणि कोकणी भाषेचा संकर झाला. ही संकरभाषा घाटकोकणी नावाने परिचित झाली.

बदलत्या काळातील दळणवळण साधने, लोकजीवनातील सहसंबध, नातेसबंध जोडण्याची सामाजिक प्रक्रिया यामुळे ही भाषा अधिकच वाढत गेली. मूळभाषेपेक्षा या घाटकोकणी भाषेचा वापर सर्वाधिक झाला म्हणूनच ही संकर भाषा, तिची भिन्नता, साम्यता, हेल, आकृतीबंध व्याकरण आणि गरजा यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. बोलीच्या उपभाषांच्या संशोधनात या विषयाचे महत्व निश्चितच आहे.

## प्रोदशिक व राष्ट्रीय प्रतिष्ठा :-

भारत स्वतंत्र झाल्यावर लोकशाहीच्या तत्वानुसार भाषावार प्रांतरचना झाली. पूर्वीच्या मध्य प्रांतातील वऱ्हाड आणि हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राला जोडून १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. या महाराष्ट्रात धर्म, जाती, पंथ या दृष्टीने विविधता आहे. विस्तृत क्षेत्रफळ, भरपूर लोकसंख्या आणि जाती जमांतीची विविधता यामुळे मराठी भाषेची प्रादेशिक रुपे साहजिकच भिन्न प्रकारची आहेत. मराठीच्या प्रादेशिक रुपांचा व बोलींचा अभ्यास म्हणताच भारतीय भाषांचे सर्वेक्षण जॉर्ज ग्रियर्सन यांनी करुन बोलीचा अभ्यास केला. साहित्य अकादमीने कोकणी बोलीला स्वतंत्र साहित्यिक भाषेचा दर्जा दिला. आता तर कोकणी बोली गोवा राज्याची राज्य भाषा बनली आहे. मराठीपेक्षा कोकणीची व्याकरण व्यवस्था भिन्न आहे मात्र स्वतंत्र भाषा मानण्याचा व्याकरण हा निकष नव्हे. हॅंबर्ग हॉलंड येथील बोली व्याकरण दृष्ट्या सारख्याच भिन्न आहेत. प्रत्यक्षात मात्र त्यांची गणना अनुक्रमे जर्मन व डच भाषेखाली होते. म्हणूनच हॉलंडची भाषा डच मानतात. या उलट स्वीडिश, डॅनिश या बोली व्याकरणदृष्ट्या खूप साम्यदर्शक असूनही त्यांना स्वतंत्र भाषेचा दर्जा नाही. सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक प्रभावाने बोलीला स्वतंत्र भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.

Scanned by CamScanner

भाषेचा मानवी जीवनाशी अगदी जवळचा संबंध आहे. जगातील मानव समूहांचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, मानव समूह दैनंदिन व्यवहार पार पाडण्यासाठी किंवा विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी कोणती ना कोणती भाषा वापरतच असतात. बोलींचे मानवी जीवनाशी असलेले निकटत्व आपल्याआपल्या स्वतःच्या उदाहरणावरुन सुध्दा लक्षात येऊ शकते. जगातील अनेक भाषा संप्रेक्षण व्यवहारासाठी बोलल्या जातात. त्यांचे लेखनही केले जाते.कोणत्याही बोलीला त्या-त्या प्रदेशात सामाजिक आणि प्रादेशिक प्रतिष्ठा असते. एखादी भाषा तिची त्या प्रदेशाशी असणारी नाळ, लोकजीवनावरील परिणाम, लोकसंस्कृतीशी असणारा संबंध आणि व्यवहारातील वापराचे प्रमाण पाहता तिचा दर्जा आणि प्रतिष्ठा ठरते. प्रदेश जितका व्यापक तितकी भाषेचेही व्याप्ती वाढते. ती बोली सतत वापरल्याने हळूहळू तिला प्रमाण भाषेचे स्वरुप येते. मूळ बोलीभाषेची उपशाखा नंतर बोली व कालांतराने तिच भाषा प्रमाण भाषा ठरण्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणजेच कालानुसार प्रादेशिक भाषा राष्ट्रीय भाषा ठरते.

अशी भाषा आणि तिचा वापर पाहता तिच्यासाठी संशोधनाची अनेक व्दारे खुली होतात. तिला तशी राष्ट्रीय भाषा म्हणून प्रसिध्दी मिळते तशी प्रदेश म्हणून एक प्रतिष्ठा लाभते. त्या बोलींचा अभ्यास म्हणजे प्रदेशांचाही अभ्यास असतो. या अनुषंगाने या संकर भाषेला सध्यातरी असे उच्चस्थान नसले तरी येत्या काळात तिच्या अतिरिक्त वापरामुळे ती प्रादेशिक राष्ट्रीय भाषा होण्याची शक्यता वाढत आहे. म्हणून तिचे संशोधन भाषा अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. या बोलीभाषा कोकण आणि घाटमाथ्यावरील गावांच्या दैनंदिन व्यवहारात कशा प्रकारे वापरल्या जातात याचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे. अशा अभ्यासाची व्याप्ती वाढविणे गरजेचे वाटते. प्रदेशातील भाषिकांना या अभ्यास संशोधनाचा निश्चितच फायदा होईल. त्यामुळे या अभ्यासास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्व आहे. म्हणून कोकण आणि घाटमाथ्यावरील गावांच्या बोलींचा अभ्यास होणे गरजेचे वाटते.

**अभ्यास पध्दती :-**

कोकण आणि घाटमाथ्यावरील बोलींचा अभ्यास करण्यासाठी विविध अभ्यास पध्दतींचा समयोचित समन्वय साधावा लागणार आहे. तथापि या अभ्यासात ऐतिहासिक, समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीना प्राधान्य द्यावे. लागेल. या बरोबरच क्षेत्रकार्य (फिल्डवर्क) मुलाखती यांचाही संशोधनासाठी उपयोग करण्यात येणार आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी अभ्यास विषयाचे वेगवेगळे विभाग करुन त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यानुसार हा अभ्यास पुढील प्रकरणातून करावयाचा आहे.

**प्रकरणीकरण**

१) प्रमाणभाषा व बोलींची पूर्वपीठिका

२) घाटमाथ्यावरील भाषिक संक्रमण

३) संक्रमित भाषांचा लोकजीवनावरील परिणाम

४) अभ्यास क्षेत्रातील भाषेच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास

५) कोकणी व घाटी भाषांचे क्षेत्रिय संकलन

६) उपसंहार

**टीप :-** वरील प्रकरणात संशोधनाअंती बदलाची शक्यता आहे.

Scanned by CamScanner